## गौतम बुद्ध - जीवन चरित्र :

गौतम बुद्धाचा जन्म इ.स.पू. ५६६ मध्ये (वैशाख शुद्ध पौर्णिमा) नेपाळच्या सरहद्दीवर असलेल्या कपिलवस्तु नगराजवळ लुंबिनी येथे झाला. त्यांचे वडील शुद्धोदन है शाक्य घराण्याचे राजे होते. आई देवी गौतम बुद्धाच्या जन्माच्या सातव्या दिवशी मृत्यू पावल्यामुळे त्यांच्या पालन पोषणाची जबाबदारी त्याची मशी प्रजापती गौतमी हिच्यावर झाली. गौतम याचे पाळण्यातील नाव सिद्धार्थ होते. परंतू मावशी गौतमीने नावा मूळचा सिद्धार्थ गौतम झाले. बालपणापासूनच गौतम विरक्त वृत्तीचा होते. गौतम संन्याशी होण्याची असल्याचे भविष्य वर्तवण्यात आले होते. त्यामुळे त्यांचा खूपच काळजीपूर्वक सांभाळ करण्यात आला. त्यावे बालपण अतिशय लाडात व राजवैभवात गेले. कोणत्याही प्रकारचे दुःख त्यांच्याजवळ येणार नाही याकरीता सर्व सोयी नियुक्त असा सुंदर राजवाडा बांधून दिला. यथावकाश सिद्धार्थचा राजकन्या यशोधरा हिच्या बरोबर विवाह झाला व त्यांना राहूल हा मुलगा झाला. वयाच्या २८ वर्षापर्यंत सिद्धार्थ वाप्रमाणे सुखोपभोगात जीवन घालवित होते...

**• गौतम यांचा गृहत्याग :**

संसार सुखात सिद्धार्थ यांचे मन रमन नव्हते. शुद्धोदन राजाने त्याचा राज्याभिषेक करण्याचे ठरवले. त्यांना आपल्या राज्याची कल्पना यावी म्हणून छन्ना नावाच्या एका विश्वासू सारथ्याबरोबर राज्य पाहण्यासाठी पाठविले. फेरफटका मारत असताना सिद्धार्थ यांनी एक वृद्ध जर्जर ग्रहस्थ, एक व्याधीग्रस्त रोगी, मृतदेहाची अंत्ययात्रा व एक विरक्त पण तेज पुंज साधू अशा चार दृश्ये पाहिली. त्या दृश्याने ते बेचैन झाले. जगात दुःख आहे याची जाणीव त्यांना पहिल्यांदा झाली. या दुःखावर उपाय शोधला पाहिजे. त्यासाठी सर्वसंग परित्याग करून सन्यास्त वृत्ती धारण केली पाहिजे असे त्यांना वाटू लागले. त्यातून वयाच्या २९ व्या वर्षी एके रात्री पत्नी व पुत्र राहूल यांचा त्याग करून सत्य शोधण्यासाठी अरण्याच्या दिशेने गेले. काही अंतरावर अंगावरील जडजवाहिर काढून भगवी वस्त्रे धारण केली व ते पूर्णतः संन्यासी झाले. यास गौतमाचे 'महाभिनिष्क्रमण' असे म्हटले जाते.

**ज्ञानप्राप्ती व धर्मप्रसार**

सत्य शोधण्यासाठी अथवा दुःखावर उपाय शोधण्यासाठी सिद्धार्थ यानी सलग सहा वर्षे भटकंती केली. अनेक ज्ञानी साधु पुरुषांची त्यांनी भेट घेतली. आलारकलाम व उद्दक राजपुत्र या दोन साधूचे शिष्यत्व पत्करले. उपास तपास, देहदंड, तप साधना सर्व काही केले, तरीही त्यांना ज्ञान प्राप्त झाले नाही. अखेर वैशाख शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी त्यांनी बोधगया येथील पिंपळ वृक्षाखाली समाधी लावली असताना ज्ञानप्राप्ती झाली. यासाठी १५ वर्षे घोर तपश्चर्या करावी लागली. अनेक यातना व कष्ट सोसल्यानंतर व ४९ व्या दिवशी समाधी लावल्यानंतर धर्मांचा खरा राजमार्ग दिसला. लोक त्यांना बोध झाला म्हणून बुद्ध म्हणू लागले. ज्या पिंपळ वृक्षाखाली । ज्ञानप्राप्ती झाली त्यास 'बोधिवृक्ष' संबोधण्यात येऊ लागले व बौद्ध धर्माचेच ते पवित्र स्थान बनले.दिव्य ज्ञान प्राप्त झाल्यानंतर गौतम बुद्धांनी आपले पहिले प्रवचन काशी जवळ सारनाथ या ठिकाणी दिले.

बौद्ध साहित्यात ही घटना 'धम्मचक्र प्रवर्तन' या नावाने प्रसिद्ध झाली. गौतम बुद्ध आपल्या पहिल्या प्रवचनत उपदेश देताना म्हणाले 'माणूस व माणसाचे माणसाशी या जगातील नाते या नव्या धम्माचा केंद्रबिंदू असून ते आपल्या धम्माचे पहिले अधिष्ठान आहे. दुःखाचे अस्तित्व नष्ट करणे व ते नष्ट करण्याचा मार्ग दाखविणे हा एकच धम्माचा उद्देश आहे. सत्य, अहिंसा, अस्तेय, व्यभिचार न करणे व मादक पेय ग्रहण न करणे ही चांगल्या जीवनाची पाच तत्त्वे आहेत. त्याचे प्रत्येक व्यक्तीने पालन केले पाहिजे. ''गौतम बुद्धाच्या प्रवचनामुळे प्रभावीत होऊन बिंबीसार राजाने आपल्या प्रजेसह त्यांचे अनुयायित्व स्विकारले. अजातशत्रू व कोसलचा प्रसेनजीत त्या राजांनी सुद्धा बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. कपिलवस्तू शहरात आल्यानंतर बुद्धानी आपला मुलगा राहुल यास बौद्ध धर्माची दिक्षा दिली. आजूबाजूच्या प्रदेशात जाऊन लक्षावधी लोकांना बुद्धांनी शिष्य बनवले.. बुद्धांनी आपल्या धर्मप्रसाराच्या कार्यामुळे बौद्ध धर्माला लोकप्रिय बनविले. अशा या महान तथागत गौतम बुद्धांचे महापरिनिर्वाण इ.स. ४८३ साली वयाच्या ८० व्या वर्षी गोरखपूर जिल्ह्यातील कुशिनारा या ठिकाणी झाले.

**बौद्ध धर्मप्रसाराची कारणे :**

**१) गौतम बुद्ध आणि त्यांची साधी शिकवण :**

गौतम बुद्धांचे व्यक्तीमत्त्व आकर्षक होते अद्भूत होते. जगातील सर्व सुखे समोर असताना त्यांनी खडतर जीवन स्विकारले व आपल्या असीम त्यागाने समाजापुढे आदर्श निर्माण केला. लोककल्याणाची त्यांची तळमळ पाहून हजारो लोक बौद्ध धर्माकडे आकर्षित झाले. बुद्धांची साधी, सरळ व सामान्य लोकाना समजेल अशी शिकवण होती. प्रत्येकाने चांगले जीवन जगावे, चांगले कर्म केले तर चांगले फळ मिळते असा साधा उपदेश त्यांनी केला. त्यामुळे सामान्य लोकांमध्ये बौद्ध धर्म अत्यंत लोकप्रिय झाला.

**२) समानतेचे तत्त्व व लोकभाषेचा वापर :**

समाजातील सर्व वर्गांना बौद्ध धर्मात प्रवेश मिळत होता. त्यांना समान वागणूक मिळत असे. पुरुषाप्रमाणेच स्त्रीयांना सुद्धा बौद्ध धर्मात सहज प्रवेश मिळत असे तसे धर्मप्रसारासाठी त्यांनी बोली भाषेचा वापर केला. पाली ही तत्कालीन लोकभाषा होती. धर्मप्रसाराचे कार्य गौतम बुद्धांनी पाली भाषेतून केल्यामुळे बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान लोकांना सहज समजले. एकूणच समानतेच्या तत्त्वामुळे व बोली भाषेच्या वासामुळे लोक बौद्ध धर्माकडे आकर्षित झाले.

**३) राजाश्रय**

तत्कालीन राजांनी बौद्ध धर्माला राजाश्रय दिल्यामुळे तो झपाट्याने वाढत गेला. यामध्ये राजा शुद्धोदन, प्रसेनजीत, अजातशत्रू, सम्राट अशोक, कनिष्क व हर्षवर्धन यानी बौद्ध धर्मास राजाश्रय दिला.

**४) बौद्ध संघ**

धर्मप्रसार व प्रचार करण्यासाठी गौतम बुद्धांनी संघ निर्माण केला. त्यातील हजारो भिक्षूंनी जगाच्या कानाकोपऱ्यात बौद्ध धर्माचा प्रसार केला.

**५) बौद्ध धर्मातील लवचिकता :**

काळाप्रमाणे बदलण्याची लवचिकता बौद्ध धर्मात होती. स्थानिक गरजांना अनुसरून बौद्ध धर्माने आपले स्वरूप सुद्धा बदलले. वैदिक धर्मातील दोष या धर्मात काढलेले होते. पुढील काळात मंदिरांमध्ये गौतम बुद्धांच्या मूतीची स्थापना करून पुजा केली जाऊ लागली. वैदिक धर्माशी साम्य असल्यामुळे बौद्ध धर्म लोकप्रिय बनला.

**• बौद्ध धर्माचे योगदान / कार्य**

**१) सोपा लोकप्रिय धर्म :**

कर्मकांड, यज्ञसंस्था, यज्ञीय हिंसाचार व पुरोहितशाही याने ओतप्रोत भरलेला वैदिक धर्म विषमता प्रधान व त्याचे स्वरूप क्लिष्ट बनलेले होते. अशा परिस्थितीत अत्यंत साधा, सोपा, समताप्रधान व मानवतावादी धर्म लोकांना दिला. यामुळे हा धर्म भारतात अतिशय लोकप्रिय झाला.

**२) उच्च नैतिकता, अहिंसा व समानतेची शिकवण :**

या धर्माने आपल्या शिष्यांकरीता एक उच्च आदर्श व नीतीयुक्त आचरण निश्चित करून दिले. त्यामुळे समाजातील चारित्र्य संवर्धनाला मोठ्या प्रमाणात मदत झाली. तसेच यज्ञातील हिंसा व त्याची अमानुषता व अनावश्यकता पटवून सांगितली. त्यामुळे देशातील पशुधनाचे संरक्षण व संवर्धन होऊ लागले. बुद्धांनी समाजातील सर्व लोक समान आहेत व त्यांना बौद्ध धर्माच्या मार्गाने निर्वाणपदापर्यंत जाता येईल असा विचार प्रत्यक्षात राबविला. त्यामुळे समाजातील शेवटच्या घटकामध्ये सुद्धा आत्मविश्वास निर्माण झाला.

**३) भारतीय संस्कृतीचा प्रसार**

बौद्ध धर्माचा भारत त्याप्रमाणे बाहेरही चीन, जपान, जावा, बोर्निओ इ. देशात प्रसार झाला. त्या बरोबर भारतीय संस्कृतीचा सुद्धा देशाबाहेर प्रसार झाला. भारतीय साहित्य, तत्त्वज्ञान, शिल्पकला, नृत्यकला, महाकाव्ये इत्यादींचा परदेशांत प्रसार झाला.

**४) स्थापत्यशास्त्र, शिल्पकला क्षेत्रात प्रगती :**

या क्षेत्रात बौद्ध धर्माने मोठी क्रांती घडवून आणली. बौद्ध धर्मनि स्तूप बिहार, मठ, स्तंभ, चैत्य यांच्या अप्रतिम कलाकृती निर्माण केल्या. बुद्धांच्या मुर्ती तयार केल्या, अजंठा, वेरूळ, सांची, सारनाथ या ठिकाणी शिल्पे व चित्रे काढली. त्यामुळे चित्रकला व स्थापत्य कलेत भर पडली. शिल्पलेख व स्तंभलेखांवर बौद्ध चरित्र कोरून ठेवण्यात आले. ग्रीक व बौद्ध कलेच्या संगमातून 'गांधार' कला उदयास आली.

**५) शिक्षण व साहित्य क्षेत्रात प्रगती :**

बौद्ध धर्माने मठाची स्थापना केली. त्याठिकाणी बौद्ध धर्माची शिकवण दिली गेली, शिक्षणाची सोय केली. निव्वळ धार्मिक नव्हे तर पुढील काळात विद्याकेंद्रे म्हणून उदयास आली. बिहार मधील नालंदा व विक्रमशिला तर गुजरातमधील वल्लभी ही बौद्ध विद्यापीठ प्रसिद्ध आहेत. बौद्ध धर्माने सर्वसामान्य लोकांना समजेल अशा बोली भाषेत बौद्ध धर्माचा प्रचार केला, प्रसार केला. तसेच पाली व अपभ्रंश या लोकभाषांमध्ये मोठी साहित्य निर्मिती केली. अमरकोरा, जातककथा, त्रिपिटकावर आधारीत साहित्य इत्यादी साहित्याची निर्मिती झाली.

• **बौद्ध धर्मग्रंथ**

बौद्ध धर्मग्रंथानाच त्रिपिटके म्हणतात. त्यात सुत्तपिटक, विनयपिटक आणि अभिधम्मपिटक हे तीन पिटक ग्रंथ आहेत. बौद्ध धर्मग्रंथ पाली, अर्धमागधी, संस्कृत, प्राकृत व परकीय भाषेत सुद्धा लिहिले. याशिवाय सिंहली भाषेत दिपवंश, महावंश व तिबेटी मध्ये 'दिव्यावदान' हे ग्रंथ आहेत.

• **बौद्ध धर्मातील दोन उपपंथ :**

गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर २०० वर्षात दोन मुख्य पंथ उदयास आले.

**१) हीनयान** या पंथाचा प्रसार दक्षिण भारतात झाला. हा पंथ सनातनी, कर्मठ व संन्यासमार्गी आहे. गौतम बुद्धांना सर्वसामान्य मनुष्य मानतात..

**२) महायान :** हा पंथ सुधारकबादी व उदारमतवादी आहे. या पंथाने गौतम बुद्धांना आदर्श व देवी विभूती मानले. भक्ती हे या पंथाचे साधन असल्यामुळे वैदिक धर्माप्रमाणे त्यांनी मूर्तीपूजा आरंभ केली. यांनीच बुद्ध मूर्तीपूजेस सुरूवात केली.

• **बौद्ध धर्माच्या -हासाची कारणे :**

बौद्ध धर्माच्या -हासाला इ.स.पू. ३ प्या शतकापासून प्रारंभ झाला. त्याची कारणे पुढीलप्रमाणे-

**१) राजाश्रयाचा अभाव :**

गौतम बुद्ध राजघराण्यातील होते. त्यामुळे सुरूवातीपासूनच बौद्ध धर्माला राजाश्रय मिळाला. त्यानंतर अनेक राजांनी बौद्ध धर्माला राजाश्रय मिळाला. सम्राट अशोकाने तर संपूर्ण राज्ययंत्रणाच बौद्ध धर्माच्या प्रचार व प्रसारासाठी राबविली. सम्राट अशोकानंतर मात्र आलेल्या शुंग, वाकाटक व गुप्त राजांनी वैदिक धर्मास उत्तेजन देऊन त्याचे पुनरुज्जीवन घडवून आणले. त्यामुळे बौद्ध धर्माचा राजाश्रय संपला व त्याची पिछेहाट झाली..

**२) वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन :**

वैदिक धर्मातील कर्मकांड, दोष यांचे निवारण करून पुढे शंकराचार्य व कुमारील भट्ट यांनी वैदिक धर्मास श्रेष्ठ बनविले. बौद्ध धर्म व पंथावर टिका केली. या धर्मातील अनेक दोष स्थळे समाजाच्या निदर्शनास आणले व लोकांची मने हिंदू धर्माकडे आकर्षित केली. परिणामी हिंदू धर्माचे पुनरुज्जीव झाले व बौद्ध धर्म मागे पडला.

**३) बौद्ध धर्मातील तात्वीक मतभेद व पंथभेद :**

गौतम बुद्धांच्या निर्वाणानंतर बौद्ध भिक्षूमध्ये वैचारिक मतभेद निर्माण झाले. त्यातून बादबिवाद निर्माणझाले. त्यामध्ये बौद्ध, भिक्षूंची शक्ती खर्च होऊन धर्म प्रसाराकडे दुर्लक्ष झाले. या मतभेदातून महायान व हीनयान पंथ निर्माण झाले.

**४) बौद्ध धर्मातील अध्यात्मिक अवनती :**

गौतम बुद्ध हे जगाला निर्वाण मार्ग दाखविणारे आचार्य ही कल्पना मागे पडली. बुद्धांना देवी विभूती बनवले, भक्तीमार्गाचा स्विकार करून स्वत:ची शुद्धता घालवली. महायान पंथाने बुद्धांची मूर्ती पूजा सुरू केली. बौद्ध धर्मात अनिष्ठ प्रथा सुरू झाल्या. बौद्ध संघात भिक्षु–भिक्षुणीतील नीतीनियमाचे पालन संपुष्टात आले. उदार व पवित्र धर्माकडे दुर्लक्ष केल्यामुळे बौद्ध धर्माचा -हास झाला.

**५) परकीयांची आक्रमणे :**

भारताची लूट करण्याच्या इराद्याने आलेल्या हूण आक्रमकांनी व इस्लामी आक्रमकांनी अनेक बौद्ध, बिहार, स्तूप व विद्यापीठे यांचा विध्वंस केला. लूटालूट केली. जाळपोळ केली. त्यामध्ये शेकडो भिक्षू मारले गेले. बौद्ध संघ व बिहार याच्या नाशाबरोबर बौद्ध धर्माची इमारत कोसळली,

वरील सर्व कारणांचा इ.स. १२ व्या शतकापर्यंत बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणावर -हास झाला.

## बौद्ध तत्त्वज्ञान

इ.स.पू. ६ व्या शतकात उदयाला आलेल्या बौद्ध धर्माने ब्राह्मण धर्मावर सर्वात मोठा आघात केला. जैन धर्माप्रमाणे हाही धर्म ब्राह्मण धर्मातील क्लिष्ट तत्त्वज्ञान व यज्ञादि कर्मकांडाच्या विरुद्ध एक तीव्र प्रतिक्रिया होती. यामुळेच या धर्मात साधेपणाला विशेष स्थान देण्यात आले आहे. गौतम बुद्ध या धर्माचे संस्थापक आहेत.

गौतम बुद्धानी संसाराला दु:खाचा महासागर मानून त्यातून पैलतीर गाठण्याचा गार्ग सांगितला आहे. एकीकडे संसार हा क्षणभंगूर आहे हे सांगत असताना दुसरीकडे नैतिक आचरणाद्वारे त्यातून बाहेर पडण्याचा मार्गही या महामानवाने दाखविला आहे. त्यांच्या शिकवणुकीला आपण दोन भागांत विभाजित करू शकतो.

अ) तत्त्वज्ञान आणि ब) नैतिक किंवा व्यावहारिक आचरणाचे नियम.

**अ) तत्त्वज्ञान -**

**१) कर्मवाद –**

बौद्ध धर्मानुसार कर्म म्हणजे मनुष्याने मनसा, वाचा, कायाद्वारा बौद्ध धर्म कर्मप्रधान आहे. आस्तिकवाद्यांच्या दृष्टीने ईश्वराचे जे स्थान तेच स्थान बौद्ध धर्मात कर्माचे आहे. एका ठिकाणी उपदेश करताना महात्मा गौतम बुद्ध म्हणतात त्यालाच मोक्षप्राप्ती होईल." बौद्ध धर्मानुसार मनुष्याला त्याच्या कर्मानुसार गती प्राप्त होत असते. त्यामुळे मनुष्याच्या दृष्टीने कर्म हेच सर्वस्व आहे. त्यांनी कर्मवादाच्या • "जो मनुष्य मग तो ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किवा शूद्र असो, सम्यक कर्म करेल अंतर्गत समाजाच्या नैतिक आदर्शावर विशेष भर दिला आहे. यावरून कर्मवाद हा बौद्ध तत्त्वज्ञानाचा पाया आहे हे स्पष्ट होते.

**२) प्रतीत्यसमुत्पाद**

या सिद्धांतानुसार प्रत्येक वस्तूच्या उत्पत्तीच्या कोणते ना कोणते कारण असते. हा शब्द प्रतीत्य (एखाद्या वस्तूचे अस्तित्व असल्यावर) + समुत्पाद दुसऱ्या वस्तूची उत्पत्ती होते) या दोन शब्दांनी मिळून बनला आहे. या सिद्धांताद्वारे गौतम बुद्धाना दुःखाचे कारण जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे या सिद्धांतानुसार संसारातील घडणाऱ्या प्रत्येक घटनेशी कोणते ना कोणते कार असते. त्यामुळे दुःखाच्या मुळाशीही एखादे कारण असते. ते अकारण निर्माण नाही. या सिद्धांताच्या अंतर्गत बारा निष्कर्षाद्वारे सर्व दुःखाचे मूळ अज्ञानात हे सिद्ध करण्याचा गौतम बुद्धांनी प्रयत्न केला आहे. अज्ञानी मनुष्य सांसारिक सुखाल व इंद्रियभोगांना खरे सुख मानून त्याकडे आकर्षित होते व त्यालाच सत्य व शक्त सुख मानतो. हे दुःख निर्माण होण्याची प्रक्रिया पुढील पद्धतीने समजून घेता येईल.

१) अविज्ञा - सत्य किंवा वास्तव जाणून घेण्याच्या क्षमतेचा अभाव व अज्ञान.

२) संस्कार - अविज्ञेमुळे संस्कार निर्माण होतात जे मानसिक चिंतनाचे केव सूक्ष्म अंश आहेत.

३) विज्ञान - संस्कारामुळे विज्ञान निर्माण होते जे संस्कारांचे व्यापक रूप आहे.

४) नाम-रूप - विज्ञानाने नाम आणि रूप अर्थात गर्भस्थ भ्रूणाच्या शरीर व मनाची निर्मिती होते.

५) षडायतन - याचा अर्थ आहे पाच इंद्रिये आणि मनाची उत्पत्ती नम रूपाच्या उत्पत्तीनंतर पाच इंद्रियांसहित मन निर्माण होते.

६) स्पर्श - इंद्रियांद्वारा स्पर्श म्हणजे पदार्थांशी संपर्क स्थापित होतो. उसे नाकामुळे सुवास घेऊन आपण फुलांकडे आकर्षित होतो.

७) वेदना - स्पर्शामुळे वेदना निर्माण होते. कारण सांसारिक विषयांच्या संपर्कात आल्यानंतरच मनुष्य प्रिय वस्तूच्या वियोगाने दुःखी आणि संयोगाने सुखाचा अनुभव करतो.

८) तृष्णा सांसारिक वस्तूंच्या प्राप्तीची इच्छा म्हणजे तृष्णा. ही तेव्ह निर्माण होते जेव्हा मनुष्य वेदनेद्वारे सुख-दुःखाचा अनुभव घेतो.

९) उपादान हे तृष्णेचेच व्यापक रूप आहे. याला वासना किंवा आस म्हणता येईल. उपादानामुळे मनुष्य सदैव भोगात गुंतून राहण्यासाठी धडपड करतो.

१०) भव याचा अर्थ जन्म घेण्याची प्रवृत्ती. सांसारिक विषयांप्रती उपादानामुळेनिर्मिती होते.

११) जन्म भव म्हणजे जन्म घेण्याची प्रवृत्ती निर्माण झाल्यावरच मनुष्य जन्म

१२) दुःख जन्म झाला की दुःखाची सुरुवात होते. कारण जन्म झाला की रोग, दुःख, नैराश्य, वार्धक्य, मृत्यू ही दुःखाची विविध रूपे त्याच्या मागे लागतात. प्रतीत्यसमुत्पादवरून एक गोष्ट स्पष्ट होते की, अज्ञानामुळे मनुष्य जन्म घेतो झाला की दुःखाचा धनी होतो.

**१) नास्तिकवाद किंवा अनीश्वरवाद –**

बुद्धाने ईश्वराची सत्ता नाकारली ३ जन्म आहे. ते ईश्वराला सृष्टीचा निर्माताही मानत नाही. कारण त्यामुळे ईश्वराला दुःखाचा निर्माताही मानावे लागते. गौतम बुद्धाच्या मते सृष्टीत केवळ दुःखच भरले आहे. त्यामुळेच अनेक विद्वान गौतम बुद्धाला अनीश्वरवादी मानतात. परंतु बुद्धाला नास्तिक णे चूक आहे कारण ते नास्तिक असते तर त्यांनी ईश्वरी सत्तेचा उघडपणे विरोध केला असता परंतु त्याला जेव्हा जेव्हा ईश्वरासंबंधी प्रश्न विचारण्यात आले तेव्हा तेव्हा यानी मौन धारण केले आहे. शिवाय ते कर्मवादी असल्याने त्यांनी मानवाला कर्मवादाची शिकवणूक दिली व म्हणूनही ईश्वरासंबंधी प्रश्नांची उत्तरे देण्याबाबत उदासीनता दाखविली.

**२) अनात्मवाद –**

बुद्ध आत्म्याचे अस्तित्व नाकारतात. त्यांच्या मते जीवन जे निरनिराळ्या कर्मबद्ध आणि अव्यवस्थित अवस्थांचा एक प्रवाह आहे. या प्रवाहात प्रत्येक अवस्थेची उत्पत्ती तिच्या पूर्ववर्ती अवस्थेतून होत असते. त्यानुसार वर्तमान अवस्था भविष्यकालीन अवस्था निर्माण

करते. जीवनाच्या निरनिराळ्या पूर्वापार अवस्था या कार्य-कारण संबंधाद्वारे परस्परांशी संलग्न असतात. त्यामुळे जीवन हे एकसंध किंवा एकरूप प्रतीत होते.

**३) पुनर्जन्म –**

गौतमबुद्ध आत्म्याचे अस्तित्व नाकारत असले तरी पुनर्जन्म .. मानतात. त्यामुळे प्रश्न असा निर्माण होतो की, जर आत्म्याचे अस्तित्वच नाही तर पुनर्जन्म कसला, तो कुणाचा होतो? गौतम बुद्ध म्हणतात पुनर्जन्म संस्कारांचा होतो. सुष्याच्या वर्तमान जीवनाच्या अंतिम अवस्थेतून भावी जीवनाची म्हणजे पुनर्जन्माची पहिली अवस्था निर्माण होते. बुद्ध विज्ञानाच्या प्रवाहाला मानत होते आणि तेच पुनर्जन्माचे धरण असते.

**४) क्षणिकवाद –**

प्रतीत्यसमुत्पाद द्वारा गौतमबुद्धाने क्षणिकवादाच्या सिद्धांताचेही प्रतिपादन केले आहे. या सिद्धांताद्वारे ते सांसारिक गोष्टींची अनित्यता सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या मते प्रत्येक वस्तु परिवर्तनशील आणि नाशवंत असते. तसेच झाला की वस्तूचाही नाश होतो. महापरिनिब्बानसुत्तमध्ये या संदर्भात उल्लेख आहेत. प्रत्येक • वस्तूच्या उत्पत्तीमागे कोणते ना कोणते कारण असते. त्यामुळे कारणाचा नाश अनुसार प्रत्येक वस्तचे अस्तित्व एका क्षणासाठीच कायम असते. प्रत्येक वस्तूची क्रियाशीलताच त्या वस्तूचे क्षणभंगुरत्व सिद्ध करते. ज्याप्रमाणे एका बीजाचा त्याचे रोपटे व रोपट्याचा वृक्ष तयार होतो. त्याचप्रमाणे या जगातील प्रत्येक वस्तु अंकुर परिवर्तनशील असून क्षणिक आहे. वस्तूच्या रूपाचे प्रतिक्षण परिवर्तन होत असते परंतु त्याची आपल्याला जाणीव होत नाही. अंकुर किंवा कोंब एकदम बाहर दे नाही तर मातीत बीज रुजल्यानंतर कोंब तयार होण्याची प्रक्रिया प्रतिक्षण सुरू असते.

**५) निर्वाण**

बौद्ध तत्त्वज्ञानानुसार निर्वाणाद्वारेच दुःखाचा अंत केला जाऊ शकतो. म्हणूनच गौतमबुद्धानुसार निर्वाणपद हे जीवन काळातच प्राप्त होऊ शकते. राग-द्वेषावर मात करून जो मनुष्य त्यापासून उत्पन्न होणाऱ्या दुःखापासून अप्रभावीत किवा अलिप्त राहतो तोच निर्वाणपद प्राप्त करू शकतो. वास्तविक निर्माण अवस्था म्हणजे राग-लोभ-द्वेष आणि त्यापासून उत्पन्न दुःखाच्या नाशाची अवस्था आहे. ह अस्तित्वाच्या नाशाची अवस्था नसून सर्व सांसारिक वस्तूंच्या प्राप्तीच्या इच्छेपासून मुक्त होण्याची अवस्था आहे.

**ब) नैतिक किंवा व्यावहारिक आचरणाचे नियम.**

नैतिक किंवा व्यावहारिक आचरणाचे नियम चार आर्य सत्य महात्मा गौतम बुद्धाच्या समस्त शिकवणुकीचे सार त्यांनी सांगितलेल्या चार आर्य सत्यात समावले आहे. हाच उपदेश त्यांनी सर्वसामान्यांना दिला.

१) सांसारिक जीवन दुःखमय आहे..

२) दुःखाचे कारण आहे.

३) दुःखाचा अंत होऊ शकतो.

४) दुःखाचा अंत करण्याचा उपाय आहे.

**१) दुःख**

मानव आणि मानवेतर सर्वच जीवन दुःखाने ओतप्रोत आहे. जन्म, रोग, आजारपण, क्लेश, शोक, आकांक्षा, नैराश्य, वार्धक्य, मृत्यू या सर्वांचे कारण तृष्णा किंवा आसक्ती आहे. ही सर्व दुःखाची विभिन्न रूपे आहेत. सांसारिक वस्तूंपासून प्राप्त होणारे सुख हे क्षणिक असून त्याचा अंत दुःखदायी असतो. त्यामुळे संसारात सर्वत्र दुःखच दुःख भरले आहे. जगात सदासुखी असा कुणीही नाही. शिव वस्तूंचा त्याग अप्रिय वस्तूंची प्राप्ती यामुळे मनुष्याला दुःख होते.

**२) दुःख समुदाय –**

दुःखाचे मूळ कारण तृष्णा आहे आणि तृष्णा किंवा आसक्ती ही अज्ञानापासून निर्माण होते. जर अज्ञान दूर झाले तर दुःखापासून सुटक होऊ शकते. महात्मा बुद्ध म्हणतात की रूप, शब्द, गंध, रस, स्पर्श तथा मानसिक तर्क-वितर्कामुळे मनुष्य आसक्त होतो आणि येथेच तृष्णा जन्म घेते. भौतिक सुखाची लालसा आणि त्याच्या अभावी दुःख हे अज्ञानातून निर्माण होते. अज्ञानामुळेच मनुष्य तृष्णेच्या आहारी जातो आणि कर्मबंधनात फसतो. सतृष्ण मनुष्य कधीही दुःखापासून मुक्त होऊ शकत नाही.

**३) दुःख निरोध**

संसार जरी दुःखमय असला तरी त्या दुःखाचा अंत •ब्रेक शकतो. दुःखाचे कारण एकदा लक्षात आले की ते दूर करण्याचा मार्ग शोधता येतो. दुःख निरोध म्हणजे दुःखापासून सुटका. दुःखाच्या कारणाचा नाश झाला की दुःखही नाहीसे होते. दुःखापासून मुक्ती म्हणजे

मोक्षाच्या दिशेने वाटचाल होय. दुःखापासून सुटका झाली की अहं, आसक्ती या गोष्टी आपोआप नाहीशा होतात. या गोष्टी नष्ट झाल्यावरच मनुष्याला शाश्वत सुखाचा अनुभव घेता येतो. गौतमबुद्ध उपदेश करताना एका ठिकाणी म्हणतात- "संसारात जे काही प्रिय वाटते, ज्यापासून आनंद मिळतो. असे वाटते त्याला जो श्रमण किवा ब्राह्मण दुःखरूप, रोगरूप समजेल, त्यापासून दूर राहील तोच तृष्णेपासून दूर राहू शकतो."

**४) दुःख निरोधाचा मार्ग किंवा दुःख निरोधगामिनी प्रतिपदा**

दुःखाचा नाश करून त्यापासून सुटका मिळविता येते. दुःखाचा नाश करण्याचे वर्ग आहेत. आत्यंतिक भोगवाद किंवा आत्यंतिक त्यागवाद तसेच तंत्रमंत्र हे तृष्णा ह करण्याचे मार्ग नाहीत. आत्मक्लेश किंवा यज्ञयाग यामुळे मुक्ती मिळत नाही. यासाठी गौतम बुद्धांनी त्रिविध मार्ग सांगितला आहे. प्रज्ञा (अलौकिक बुद्धिमत्ता), समाधी (चित्ताची एकाग्रता) आणि शील (अहिंसा, करुणा, ममता इ.) समाधीद्वारे चित्ताची एकाग्रता होऊन प्रज्ञा प्राप्त होते. प्रज्ञेमुळे अज्ञान व अज्ञानामुळे तृष्णा दूर होते व शीलामुळे कर्माचा नाश होतो. समाधी, प्रज्ञा व शील हे दुःखनिरोधाचे तीन मार्ग आहेत. काही काळानंतर गौतम बुद्धांनी याला एक नवीन मार्ग जोडला त्याला अष्टांग मार्ग म्हणतात.

**अष्टांग मार्ग**

**१) सम्यक दृष्टी -**

सम्यक दृष्टी म्हणजे विश्वास, श्रद्धा. श्रद्धा आणि भावनायुक्त ज्ञान हे कल्याणकारी असते. याला प्रज्ञा म्हणतात. श्रद्धेविना ज्ञान म्हणजे मूढतेचे प्रतीक आहे. सत्यावर विश्वास आणि श्रद्धा असली म्हणजे माणसाला सद्सद्विवेकबुद्धी प्राप्त ही बुद्धी प्राप्त होणे म्हणजे सत् आणि असत्, पाप आणि पुण्य, चांगले आणि वाईट, सदाचार आणि अनाचार यातील फरक लक्षात घेणे. यामुळे चार आर्यसत्यांची ओळख होऊन दुःखापासून मुक्ती मिळविता येते.कार्यसिद्धी होत नाही तर क्रोध, हिंसा, मोह यापासून मुक्त होण्याचा दृढ संकल्प

**२) सम्यक् संकल्प**

केल्यावरच दुःखापासून सुटका होते. संकल्प म्हणजे दृढनिश्चय. केवळ सत्य जाणल्याने त्यातही विनम्रता व माधुर्य असावे. आपल्या भाषणाने इतरांच्या भावना दुखावणार नाही याची काळजी घ्यावी. कठोर, असत्य भाषण, निंदानालस्ती टाळावी. सत्यवचनी, मित

**३) सम्यक् वाक्** –

मृदुभाषी असावे. वाक म्हणजे वचन, भाषण. नेहमी सत्य बोलावे परंतुत्यातही विनम्रता असावी आपल्या भाषणाने इतरांच्या भावना दुखावणार नाहीत याची काळजी घ्यावी

**४) सम्यक् कर्मात**

येथे कर्म याचा अर्थ सत्कर्म असा आहे. हिंसाचारी व्यभिचार यांचा त्याग करून दया, दान, धर्म या सदाचाराचा अवलंब करावा, कमांचा अंत होऊन मनुष्याला मुक्ती मिळते.

**५) सम्यक् आजीव**

आजीव म्हणजे उपजीविका सन्मार्गानि मिळविलेल यामुळे संपत्ती सत्कर्म करीत उपजीविकेसाठी खर्च करावी.

**६) सम्यक् स्मृती**

स्मृती म्हणजे स्मरण. ज्या विषयांचे आपल्याला झाले आहे त्याचे नित्य स्मरण करावे. मनुष्याचे प्रत्येक आचरण हे सदाचार व विवेकयुक्त असावे. शारीरिक व मानसिक दुबळेपणाला बळी न पडता यापासून सतत दूर राहायचे स्मरण ठेवावे

**७) सम्यक् व्यायाम** –

व्यायाम म्हणजे शिस्त. मनुष्याने प्रयत्न करून मनाव व शरीराला शिस्त लावायला हवी शिस्त म्हणजे स्वतः च्या नैतिक, आध्यात्मिक व मानसिक उन्नतीसाठी प्रयत्न करणे यासाठी सुविचार अंगी बाणावेत.

**८) सम्यक् समाधी** –

ही अष्टांग मार्गाची चरम अवस्था आहे जो मनुष्याला निर्वाण अवस्था प्राप्त करून देण्यात मदत करते. समाधी म्हणजे चित्तायता चिता शुद्धता चित्ताच्या एकाग्रतेमुळे चित्तशुद्ध होऊन मनुष्य संसारातील सर्व मोह मुक्त होतो. मनातील भ्रम दूर होऊन मनाला शांती व समाधान लाभते. चिताला शांती व समाधान लाभले की मोक्षाचा मार्ग सुकर होतो.

बुद्धाची अन्य तत्त्वे गौतम बुद्धांचा सगळा भर आचरणावर होता म्हणून बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान म्हणजे सदाचाराचे नियम होत.

**१) मध्यममार्ग**

आत्यंतिक भोगवाद किया यज्ञ कर्मकांड तसेच अत्यंतिक त्यानवाद किया आत्मक्लेश यामुळे मोक्षप्राप्ती होत नाही, हे स्वानुभवावरून गौतमबुद्ध लक्षात आले होते. सर्वसुखे पायाशी लोळण घेत असतानाही गौतमबुद्ध आत्मशांतीसाठी तळमळत होते. उग्र तपश्चर्या करून, शरीराला सर्व प्रकारच्या यातना व क्लेश देऊनही । गौतम बुद्धाला आत्मशांतीचा मार्ग सापडला नव्हता. म्हणूनच गौतम बुद्धांनी या टोका दोन्ही मार्गामात्यान करण्याचा उपदेश केला. या दोन्ही मार्गाच्या मधला मार्ग म बुद्धांनी सांगितला म्हणून त्या मार्गाला 'मध्यमा प्रतिपदा' किंवा 'मज्झिमण' म्हणतात

**२) सत्कर्म**

बौद्ध धर्म हा कर्मप्रधान आहे. बुद्ध म्हणतात की, मनुष्याच कायिक, वाचिक आणि मानसिक क्रिया त्याच्या कर्माशी निगडित असतात. मनुष्य ज्या प्रकारचे कर्म करतो त्याप्रमाणे त्याला इहलोक गती प्राप्त होत असते. त्याच्या कर्मानुसार त्याला फळ मिळत असते. यज्ञ किंवा कर्मकांडामुळे त्याला दुष्कर्मापासून सुटका मिळू शकत नाही. कुणीही मध्यस्थ त्याला मोक्षाप्रत नेऊ शकत नाही हाच स्वतः या भाग्यविधाता आहे. केवळ सत्कर्मामुळेच त्याचे भाग्य उजळते.आध्यात्मिक उंची वाढविण्यासाठी, निर्वाणपद प्राप्तीसाठी इतर कोणतेही धार्मिक क्रियाकलाप न करता प्रत्येकाने सत्कर्म कराव.

**३) सदाचार-** बौद्ध तत्त्वज्ञानाचा सगळा भर सदाचरणावर आहे. त्यांनी सदाचाराचे दहा भाग केले त्यांना दहाशील म्हणतात.

**अ) अहिंसा** –

अहिसा बौद्ध धर्माचे अविभाज्य अंग आहे. परंतु या तत्त्वाचा अतिरेक करण्यात आला नाही. दया, प्रेम, करुणा, मुक्या व दुबळ्या प्राण्यांना न दुखविणे याला बुद्धांनी अहिंसा म्हटले आहे.

**ब) अस्तेय**

दुसऱ्याची चल किंवा अचल संपत्ती त्याने स्वेच्छेने दिल्याशिवाय स्वीकारू नये.

**क) सत्यभाषण-**

कोणत्याही मोह किंवा भीतीच्या आहारी जाऊन असत्य भाषण करू नये

**ड) अपरिग्रह** –

माणसाच्या भुकेला अंत नाही. त्याचे कधीही समाधान होत नाही म्हणून आवश्यकतेपेक्षा जास्त वस्तूंचा संग्रह करू नये.

**इ) ब्रह्मचर्य** –

बह्मचर्य शब्दाचा शब्दशः अर्थ बुद्धांना अभिप्रेत नाही. ब्रह्मचर्याचे पालन करणे म्हणजे विषय वासनेच्या आहारी न जाणे.

**प) नाचगाण्याचा त्याग -** नाचगाण्यामुळे माणसाच्या चित्तवृत्ती उत्तेजित होतात. उत्तेजना कुकर्मास प्रवृत्त करते म्हणून नांचगाण्याचा त्याग करावा.

**फ) सुवासिक वस्तूंचा त्याग**

सुगंधी व सुवासिक वस्तूंच्या वापरानेही उत्तेजना निर्माण होऊन मनुष्य कामुक होतो म्हणून त्यांचा त्याग करावा.

**ग) अवेळी भोजनाचा त्याग**

शरीराला शिस्त लावण्यासाठी नियमित व ठरलेल्या वेळी सात्विक भोजन करणे आवश्यक आहे.

**म) कोमल शय्येचा त्याग** –

कोमल शय्या ही भोगविलासाचे प्रतीक असल्याने तिचा त्याग करावा.

**त) कनक व कांता** –

जगातील बहुतेक वाद हे कनक आणि कांता यामुळे निर्माण होतात. त्यांच्या मोहाला बळी न पडता त्यांचा त्याग करावा.

गौतम बुद्ध स्वतः वृत्तीने अतिशय उदार आणि सहिष्णू होते. त्यांनी कोणत्याही गोष्टीचा आग्रह धरला नाही. उलट अंधश्रद्धांवर कडाडून हल्ला चढविला. कोणतीही गोष्ट स्वीकारण्यापूर्वी ती बुद्धी व तर्काच्या कसोटीवर पारखून घ्यावी "आत्मदीप व्हा" हा गौतम बुद्धाचा उपदेश होता. बुद्धिप्रामाण्य हे बौद्ध धर्माचे फार मोठे वैशिष्ट्य आहे. गौतमबुद्ध पुरोगामी होते. त्यांनी वैदिक धर्मातील अनेक अतार्किक व अवास्तव गोष्टींना फाटा दिला त्यांचा धर्म वास्तववाद व व्यवहारवादावर आधारलेला होता. सामान्य माणसालाही मोक्ष मिळू शकतो पण त्यासाठी तृष्णा व अहंकाराचा त्याग करायला हवा हे त्यांच्या उपदेशांचे मुख्य सूत्र होते. गौतम बुद्धांचे हे सर्व तत्त्वज्ञान स्वानुभवातून

निर्माण झाले. त्यांनी सर्व प्रयोग प्रथम स्वतःवर केले व स्वानुभवातून योग्य वाटलेला मार्ग त्यांनी जगापुढे ठेवला हा मार्ग ठेवत असताना कोणताही अट्टाहास नाही. वैदिक परंपरेवर टीका करतानाही बुद्ध संयम पाळतात. आत्मोद्धारासाठी यज्ञ, धार्मिक विधी, क्लेश यांची अनावश्यकता प्रतिपादन करताना ते 'गुरू'चेही महत्त्व नाकारतात. लोक प्रयोग करत करत, निरनिराळ्या मार्गांचे अनुसरण करत करत शेवटी आपलाच मार्ग स्वीकारतील यावर बुद्धाचा विश्वास आहे. म्हणूनच ते आत्मदीप व्हा, स्वतःच स्वतःचे पथप्रदर्शक व्हा असे सांगतात आणि हेच गौतम बुद्धाच्या शिकवणुकीचे सार आहे.